| MHRG140002432023 | दाखल दिनांक | - | ०९.०२.२०२३ |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | - | ०९.०२.२०२३ |
| | निकाल दिनांक | - | १२.०६.२०२६ |
| | कालावधी | - ०३ व. ०४ म. ०३ दि. | |

**भाग 'अ'**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उरण, ता. उरण, जि. रायगड यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी : एस.पी.वानखडे)**

**(न्यायनिर्णय दिनांक १२.०६.२०२६ रोजीचा)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ६६/२०२३** **नि.क्र. ५७ क लगत**

**उरण पोलीस स्टेशन येथील गुन्हा नोंद क्र. ३०४/२०२१**

**भारतीय दंड संहिता कलम १८८ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (३) सहवाचित कलम १३५ अन्वये**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष / फिर्यादी** | **महाराष्ट्र शासन**<br>उरण पोलीस ठाणे तर्फे पोलिस ठाणे अधिकारी,<br>पोलिस ठाणे उरण |
| **प्रतिनिधीत्व** | सहाय्यक सरकारी अभियोक्ता,<br>**श्री. पी. बी. देशमाने** |
| **आरोपी** | १. **मनोहर गजानन भोईर,**<br>वय ६५ वर्षे, व्यवसाय – व्यापार ,<br>रा. श्रीगणेश बंगलो, विमला तलावाजवळ,<br>ता. उरण जि. रायगड. |

| | |
|---|---|
| | २. **प्रशांत बाळकृष्ण पाटील. (मयत)**<br><br>३. **महेंद्र तुकाराम घरत**<br>वय ५६ वर्षे, व्यवसाय – व्यापार ,<br>रा. मु. पो. शेलघर, ता. पनवेल, जि. रायगड.<br><br>४. **जनार्दन धाया जोशी,**<br>वय ६४ वर्षे, व्यवसाय – शेती ,<br>रा. विंधणे, पो. दिघोडे, ता. उरण, जि. रायगड.<br><br>५. **मेघनाथ विठोबा तांडेल,**<br>वय ६५ वर्षे, व्यवसाय – व्यापार,<br>रा. मु. पागोटे, ता. उरण, जि. रायगड.<br><br>६. **पारसनाथ टिळकधारी चव्हाण,**<br>वय ५९ वर्षे, व्यवसाय – कंत्राटदार,<br>रा. डाउरनगर, ता. उरण, जि. रायगड.<br><br>७. **नरेश दत्ता रहाळकर,**<br>वय ६० वर्षे, व्यवसाय – ,<br>रा. श्री अपार्टमेंट, पहिला माळा, रूम नं. १०१, कोटनाका, ता. उरण, जि. रायगड. |

| | |
|---|---|
| | ८. **गणेश किसन नलावडे,**<br>वय ४५ वर्षे, व्यवसाय – ,<br>रा. चिऊ निवास, घर नं. ५० ते ५१, गणेशनगर क्र.२, करंजा रोड, ता. उरण, जि. रायगड.<br><br>९. **कैलास मोरेश्वर भोईर,**<br>वय ४० वर्षे, व्यवसाय – ,<br>रा. घर क्र. १६५०, चारफाटा, ता. उरण, जि. रायगड. |
| **प्रतिनिधीत्व** | आरोपी क्र. १ ते ५ व ८ तर्फे वकिल **श्री. निनाद नाईक**<br>आरोपी क्र. ३ तर्फे वकिल **श्री. किशोर ठाकुर**<br>आरोपी क्र. ४ तर्फे वकिल **श्री. अनुराग ठाकुर**<br>आरोपी क्र. ९ तर्फे वकिल **श्री. जितेंद्र कातरणे** |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ११.१०.२०२१ |
| फिर्याद दाखल तारीख | ११.१०.२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०९.०२.२०२३ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | २२.०७.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १२.०९.२०२५ |
| निकाल राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| निकालाची तारीख | १२.०६.२०२६ |
| शिक्षा झाल्याची तारीख, जर शिक्षा झाली असेल तर | -- |

| आरोपीचा अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीन झाल्याची तारीख | कोणत्या गुन्हयाखाली दोषारोप ठेवले | शिक्षा झाली किंवा निर्दोष मुक्त | काय शिक्षा दिली | भा. ना. सु. सं. कलम ४६८ साठी खटला सुरु असताना आरोपीचा कारागृहातील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनोहर गजानन भोईर | -- | -- | भारतीय दंड संहिता कलम १८८ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (३) सहवाचित कलम १३५ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| २ | प्रशांत बाळकृष्ण पाटील. (मयत) | -- | -- | भारतीय दंड संहिता कलम १८८ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (३) सहवाचित कलम १३५ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ३ | महेंद्र तुकाराम घरत | -- | -- | भारतीय दंड संहिता कलम १८८ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (३) सहवाचित कलम १३५ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ४ | जनार्दन | -- | -- | भारतीय दंड संहिता | निर्दोष | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | धाया जोशी | | | कलम १८८ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (३) सहवाचित कलम १३५ अन्वये | मुक्त | | |
| ५ | मेघनाथ विठोबा तांडेल, | -- | -- | भारतीय दंड संहिता कलम १८८ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (३) सहवाचित कलम १३५ अन्वये | निर्दोष मुक्त | -- | -- |
| ६ | पारसनाथ टिळकधारी चव्हाण | -- | -- | भारतीय दंड संहिता कलम १८८ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (३) सहवाचित कलम १३५ अन्वये | | -- | -- |
| ७ | नरेश दत्ता रहाळकर | -- | -- | भारतीय दंड संहिता कलम १८८ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (३) सहवाचित कलम १३५ अन्वये | | -- | -- |
| ८ | गणेश किसन नलावडे, | -- | -- | भारतीय दंड संहिता कलम १८८ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम | | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कलम ३७ (३) सहवाचित कलम १३५ अन्वये | | | |
| ९ | कैलास मोरेश्वर भोईर, | -- | -- | भारतीय दंड संहिता कलम १८८ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (३) सहवाचित कलम १३५ अन्वये | | -- | -- |

## भाग 'क'

## साक्षीदारांची यादी

**अ. अभियोगपक्ष -**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>नाव</th><th>पुराव्याचा प्रकार</th><th>निशाणी क्र.</th></tr>
<tr><td>सा.क्र. १</td><td>युवराज बापुराव जाधव</td><td>फिर्यादी</td><td rowspan="4">५७ क लगत</td></tr>
<tr><td>सा. क्र. २</td><td>शंकर शिवाजी होनमाने</td><td>तपासी अंमलदार</td></tr>
<tr><td>सा. क्र. ३</td><td>सचिन मोहनराव बोटे</td><td>साक्षीदार</td></tr>
<tr><td>सा. क्र. ४</td><td>योगेश तुकाराम भोईर</td><td>दाखल अधिकारी</td></tr>
</table>

**ब. आरोपी साक्षीदार, जर असेल तर -**

<table>
<tr><th>अनुक्रमांक</th><th>नाव</th><th>पुराव्याचा प्रकार</th></tr>
<tr><td colspan="3">निरंक</td></tr>
</table>

**क. न्यायालयाचा साक्षीदार, जर असेल तर -**

| **अनुक्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| निरंक | | |

## <u>निशाण्यांची यादी</u>

**अ. अभियोगपक्ष -**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | P1 PW1 | फिर्याद |
| २. | P2 PW1 | प्रथम खबर अहवाल |
| ३. | P3 PW2 | घटनास्थळ पंचनामा |

**ब. आरोपीपक्ष -**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | | |

**क. न्यायालयाची निशाणी -**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | | |

**ड. महत्वाच्या बाबी -**

| **अनु.क्र.** | **महत्वाच्या बाबी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| निरंक | | |

## <u>न्यायनिर्णय</u>

## (दिनांक १२ जुन २०२६ रोजी घोषित)

१. प्रस्तुत खटला हा उरण पोलीस ठाणे येथील गुन्हा रजि. क्र.

३०४/२०२१ वरून भारतीय दंड संहिता (भा.दं.सं.) चे कलम १८८ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(३) सह कलम १३५ अंतर्गत दाखल करण्यात आलेल्या आरोपपत्रातून उद्भवला आहे. प्रस्तुत खटल्यातील आरोपी क्र. २ प्रशांत बाळकृष्ण पाटील हे खटल्याच्या सुनावणीदरम्यान मयत झाल्यामुळे, त्यांच्याविरुद्धचा खटला दिनांक २२/०७/२०२५ रोजीच्या आदेशान्वये समाप्त (Abate) करण्यात आला आहे. उर्वरित आरोपी क्र. १ आणि ३ ते ९ यांच्याविरुद्ध खटल्याचे कामकाज चालवण्यात आले.

२. **अभियोग पक्षाच्या कथेनुसार संक्षिप्त तथ्ये खालीलप्रमाणे आहेतः**

दिनांक ११/१०/२०२१ रोजी महाविकास आघाडीने उत्तर प्रदेशातील लखीमपूर खेरी येथे झालेल्या शेतकरी आंदोलकांच्या अमानुष हत्येचा निषेध करण्यासाठी 'महाराष्ट्र बंद' पुकारला होता. त्या अनुषंगाने उरण शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी दिनांक ०१/१०/२०२१ रोजीच्या आदेशान्वये (जावक क्र. पोआ/नमुं/विशा/म.आ./४४९८/२०२१) महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम ३७(१)(३) नुसार ५ किंवा ५ पेक्षा जास्त लोकांनी एकत्र येण्यास, मोर्चे, निदर्शने व आंदोलने करण्यास मनाई केली होती. असे असतानाही, आरोपींनी दिनांक ११/१०/२०२१ रोजी सकाळी १०:३० ते ११:३० च्या दरम्यान गणपती चौक, देवळोली नाका, उरण येथील शिवसेना शाखेजवळ विनापरवाना एकत्र येऊन घोषणाबाजी केली आणि तेथून वैष्णवी हॉटेल, गांधी चौक, जरीमरी मंदिर, राजपाल नाका अशी पायी रॅली काढली. यामुळे त्यांनी पोलीस आयुक्तांच्या कायदेशीर मनाई आदेशाचे उल्लंघन केले. याप्रकरणी पोलीस नाईक युवराज बापूराव जाधव यांनी फिर्याद दाखल केली, ज्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला व पुढील तपास करून

आरोपपत्र दाखल करण्यात आले.

३. आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. त्यानंतर फौजदारी प्रक्रिया संहिता (फौ.प्र.सं.) च्या तरतुदींनुसार आरोपींना त्यांच्याविरुद्धच्या आरोपांचे स्वरूप (Particulars of Offence) वाचून दाखविण्यात आले. आरोपींनी गुन्हा नाकारला व खटला चालविण्याची मागणी केली.

४. या प्रकरणाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात व त्यावर माझे निष्कर्ष त्यासमोरील कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवत आहे:

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १) | अभियोग पक्ष हे सिद्ध करण्यास यशस्वी ठरला आहे काय की, दिनांक ११/१०/२०२१ रोजी आरोपींनी पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या वैध मनाई आदेशाचे जाणीवपूर्वक उल्लंघन केले आणि भा.दं.सं. कलम १८८ अंतर्गत गुन्हा केला? | - | नाही |
| २) | अभियोग पक्ष हे सिद्ध करण्यास यशस्वी ठरला आहे काय की, आरोपींनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ३७(३) चे उल्लंघन करून कलम १३५ अन्वये शिक्षापात्र असणारा गुन्हा केला? | - | नाही |
| ३) | प्रस्तुत खटला फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४६८ अंतर्गत मर्यादा कालबाह्य (Barred | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | by Limitation) आहे काय? | - | होय |
| ४) | अंतिम आदेश काय ? | - | आरोपींची निर्दोष मुक्तता. (अंतिम आदेशाप्रमाणे) |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ४ करीता :-**

५. प्रस्तुत प्रकरणात सर्वात महत्त्वाचा कायदेशीर मुद्दा म्हणजे खटला दाखल करण्याची मुदत संपली आहे का हा आहे. आरोपींच्या विद्वानांनी युक्तिवाद केला की, घटना दिनांक ११/१०/२०२१ रोजीची आहे आणि दोषारोपपत्र दिनांक ०९/०२/२०२३ रोजी न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. भा.दं.सं. कलम १८८ अंतर्गत कमाल शिक्षा ही ६ महिने कारावास आहे, तर महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये कमाल शिक्षा ही १ वर्षाचा कारावास आहे. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४६८(२)(ख) नुसार, ज्या गुन्ह्यासाठी १ वर्षापेक्षा जास्त नसलेल्या कारावासाची शिक्षा आहे, अशा गुन्ह्याची दखल घेण्याची मुदत केवळ १ वर्ष आहे. प्रस्तुत प्रकरणात गुन्हा घडल्याच्या दिनांकापासून (११/१०/२०२१) १ वर्षाची मुदत ही दिनांक ११/१०/२०२२ रोजी संपली आहे. दोषारोपपत्र दिनांक ०९/०२/२०२३ रोजी म्हणजेच सुमारे ४ महिन्यांच्या विलंबाने दाखल करण्यात आले आहे. अभियोग पक्षाने विलंबाच्या क्षमापनासाठी कलम ४७३ फौ.प्र.सं. अंतर्गत कोणताही अर्ज दाखल केलेला नाही. त्यामुळे हा खटला मर्यादा कालबाह्य असल्यामुळे कायद्याने बाद ठरतो.

६. भा.दं.सं. कलम १८८ अंतर्गत गुन्ह्याची दखल घेण्यासाठी फौ.प्र.सं. चे कलम १९५(१)(क)(१) अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यानुसार, कोणत्याही लोकसेवकाच्या कायदेशीर आदेशाचा अवमान झाल्याच्या प्रकरणात, जोपर्यंत तो लोकसेवक स्वतः किंवा त्याचा वरिष्ठ अधिकारी न्यायालयात लेखी तक्रार (Formal Written Complaint) दाखल करत नाही, तोपर्यंत न्यायालयास पोलीस अहवालाच्या (Charge sheet) आधारे अशा गुन्ह्याची दखल घेण्याचा अधिकार नाही. या खटल्यामध्ये पोलीस आयुक्तांच्या आदेशाचे उल्लंघन झाल्याचा आरोप आहे, परंतु पोलीस आयुक्तांनी किंवा त्यांच्या अधिकृत प्राधिकाऱ्याने न्यायालयात थेट लेखी तक्रार नोंदवलेली नाही. निव्वळ पोलीस अंमलदाराने दाखल केलेल्या एफ.आय.आर. आणि दोषारोपपत्राच्या आधारे भा.दं.सं. कलम १८८ चे न्यायालयीन कामकाज चालवणे बेकायदेशीर व निरर्थक ठरते. यासंदर्भात मा. मुंबई उच्च न्यायालयाचे विविध न्यायनिर्णय स्पष्ट आहेत.

७. जरी आपण गुणवत्तेवर पुराव्यांचा विचार केला, तरी अभियोग पक्ष गुन्हा सिद्ध करण्यास अपयशी ठरला आहे. अभियोग पक्षाने ४ साक्षीदार तपासले आहेत: PW-1 (फिर्यादी युवराज जाधव) यांनी केवळ घटनेचे वर्णन केले आहे. परंतु त्यांनी उलटतपासात मान्य केले की, त्यांनी मूळ मनाई आदेशाची प्रत तपास अधिकाऱ्याला दिली नव्हती. तसेच आरोपींनी खरोखरच जमाव करून घोषणाबाजी केली याबाबत कोणताही स्वतंत्र पुरावा सादर केलेला नाही. PW-2 (तपास अधिकारी शंकर होनमाने यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. परंतु त्यांनी मान्य केले की, घटनास्थळाच्या पंचनाम्यात चतुःसीमा नमूद केलेल्या नाहीत. तसेच घटना घडली ती जागा मुख्य बाजारपेठेत व गजबजलेली असताना एकही स्वतंत्र किंवा त्रयस्थ साक्षीदार तपासण्यात आलेला नाही. पंचनाम्यावरील दोन्ही पंच नियमित पोलीस पंच

असल्याचे दिसून येते. PW-3 (पोलीस हवालदार सचिन बोटे) हे बंदोबस्तावर होते असे सांगतात, परंतु त्यांच्या समक्ष कोणताही फलक (Banner) किंवा आक्षेपार्ह साहित्य जप्त करण्यात आलेले नाही. त्यांनी आंदोलनकर्त्यांच्या विरोधात कोणतीही कायदेशीर नोटीस किंवा इशारा दिल्याचे पुरावा नाही. PW-4 (पोलीस हवालदार योगेश भोईर) यांनी केवळ पूर्ण झालेल्या तपासाचे कागदपत्रे घेऊन दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले. त्यांना मूळ घटनेची कोणतीही वैयक्तिक माहिती नाही.

८. कोणताही मनाई आदेश लागू असताना त्याची स्थानिक पातळीवर योग्य प्रसिद्धी करणे आवश्यक असते. प्रस्तुत प्रकरणात, पोलीस आयुक्तांचा कथित मनाई आदेश (जावक क्र. ४४९८/२०२१) अधिकृतरीत्या रेकॉर्डवर आणून सिद्ध करण्यात आलेला नाही. केवळ पोलीस साक्षीदारांच्या तोंडी सांगण्यावरून आदेशाचे अस्तित्व गृहीत धरता येत नाही. आरोपींना त्या आदेशाची जाणीव होती आणि त्यांनी तो जाणीवपूर्वक मोडला, हे सिद्ध करणारे कोणतेही पुरावे अभियोग पक्षाकडे नाहीत.

९. सर्व पोलीस साक्षीदारांच्या साक्षी पाहता, त्यामध्ये अनेक तफावती व विसंगती आहेत. घटना ही भर बाजारपेठेत घडली असतानाही स्वतंत्र साक्षीदार न तपासणे, तसेच बेकायदेशीर जमाव दाखवण्यासाठी फोटो किंवा व्हिडिओ रेकॉर्डिंग सादर न करणे, हे अभियोग पक्षाच्या दाव्यातील गंभीर दोष दर्शवितात. संशयाचा फायदा हा नेहमी आरोपीला मिळायला हवा, हा फौजदारी न्यायशास्त्राचा मूलभूत नियम आहे.

१०. वरील विवेचनावरून, खटला मुदतबाह्य असणे, कलम १९५ फौ.प्र.सं. च्या कायदेशीर तरतुदींचे पालन न होणे आणि गुणात्मक पुराव्यांचा अभाव यामुळे

अभियोग पक्ष आरोपींविरुद्धचा गुन्हा सिद्ध करू शकलेला नाही. म्हणून मी मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्ष 'नकारात्मक' आणि मुद्दा क्र. ३ चा निष्कर्ष 'सकारात्मक' नोंदवून मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश

अ) आरोपी क्र. १ आणि ३ ते ९ यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(३) सह कलम १३५ च्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

ब) आरोपींचे जामीन रोखे आणि जामीनदार रद्द करण्यात येत आहेत.

क) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-ए अन्वये प्रत्येकी रु. १०,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र व तेवढयाच रकमेचा जामीन न्यायालयात सादर करावे, जे पुढील ६ महिन्यांच्या कालावधीसाठी लागू राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

SANTOSH PUNDLIKRAO WANKHADE
Digitally signed by SANTOSH PUNDLIKRAO WANKHADE
Date: 2026.06.12 16:44:51 +0530

उरण,
दिनांक – १२.०६.२०२६

(एस.पी.वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,उरण,
न्यायालय क्र. १ उरण

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Rasika P. Mhatre |
| Court | : | CJJD & J. M.F. C., Uran (Court No.1) |
| Date | : | 12/06/2026 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 12/06/2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 12/06/2026 |

---